**नियमित दिवाणी दावा कमांक १२९/२०२३**
**निशाणी क.२०**

## <u>पडताळणी</u>

मी देवा शपथ खरे सांगतो की, माझे नाव महेश संपत मगर आहे. माझ्या पुराव्याच्या शपथपत्रातील संपूर्ण मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे.

## <u>अधिक सरतपास - वादीतर्फे विधीज्ञ श्री.यु.बी.घोरपडे :-</u>

१. आता मला दाखवलेली कागदयादी नि.क्र. ३ अनुक्रमांक ३ वरील आम्ही आमच्या वकीलांमार्फत प्रतिवादींना पाठविलेली नोटीस तिच आहे. त्यावर माझ्या वकीलांची सही असुन त्यातील मजकुर बरोबर आहे. सदर सही माझ्यापुढे केल्यामुळे मी ती सही ओळखतो. सदर **नोटीसीला नि.क.२७** देण्यात येत आहे.

२. आता मला दाखवलेली कागदयादी नि.क्र. ३ अनुक्रमांक ४ वरील आम्ही आमच्या वकीलांमार्फत प्रतिवादी व सहाय्यक निबंधक यांना पाठविलेली नोटीस तिच आहे. त्यावर माझ्या वकीलांची सही असुन त्यातील मजकुर बरोबर आहे. सदर सही माझ्यापुढे केल्यामुळे मी ती सही ओळखतो. सदर **नोटीसीला नि.क.२८** देण्यात येत आहे

## <u>उलटतपास वादीतर्फे विधीज्ञ श्री.एस.एन.गोरे :-</u>

३. हे म्हणणे खरे नाही की यमुनाबाई हिने माझ्या लाभात मुखत्यारपत्र करून दिल्याचे मी खोटे सांगत आहे. मला एक चुलता व एक आत्या आहे. हे म्हणणे खरे आहे की माझा चुलता व आत्या यमुनाबाई यांचे वारस आहेत. माझ्या चुलत्याचे ज्ञानदेव तुळशीराम मगर आहे. हे मला सांगता येत नाही की तुळशीराम यांच्या मृत्युनंतर त्यांनी प्रतिवादी बॅंकेत ठेवलेले लॉकर माझा चुलता ज्ञानदेव याने ऑपरेट करू नये अशी आम्ही हरकत प्रतिवादींकडे घेतली आहे. हे म्हणणे खरे नाही की अशी हरकत आल्यानंतर प्रतिवादीला नॉमीनीला देखील लॉकर ऑपरेट करू देता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की अशा परिस्थितीत सर्व वारसांच्या संमतीशिवाय लॉकर ऑपरेट करता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की दावा दाखल करण्यास कोणतेही कारण घडले नाही. तसेच प्रस्तुत दाव्यात खोटया तक्रारी केल्या आहेत व आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**नियमित दिवाणी दावा क्रमांक १२९/२०२३**
**निशाणी क्र.२०**

सरतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृती,

सही/-
( एस. व्ही. खैरे)
सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर
राहाता.

दिनांक :- ०३.०२.२०२५